## वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs)

SEBI इन्वेस्टर अव्हेरनेस टेस्ट (SIAT) संदर्भातील वारंवार विचारले जाणारे प्रश्न परीक्षेच्या विविध बाबींवर प्रकाश टाकतात, जसे की पात्रता निकष, नोंदणी प्रक्रिया, परीक्षा पद्धत, अभ्यासक्रम, उत्तीर्ण गुण आणि इतर संबंधित माहिती. खाली SEBI गुंतवणूकदार जनजागृती परीक्षेचे FAQs दिले आहेत:

### 1. SEBI इन्वेस्टर अव्हेरनेस टेस्ट म्हणजे काय?

सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (SEBI) यांनी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट्स (NISM) यांच्या सहकार्याने ही परीक्षा गुंतवणूकदारांमध्ये आर्थिक साक्षरता आणि जनजागृती वाढविण्याच्या उद्देशाने सुरू केली आहे. ही उपक्रम बचत आणि गुंतवणुकीच्या मूलभूत संकल्पनांबाबत आवश्यक ज्ञान देऊन व्यक्तींना सक्षम करण्याचा प्रयत्न करतो. संभाव्य गुंतवणूकदारांना आवश्यक कौशल्ये आणि माहिती उपलब्ध करून देऊन, आर्थिक साक्षरता वाढवणे आणि सुज्ञ निर्णय घेण्यास प्रोत्साहन देणे हा यामागील उद्देश आहे. ही परीक्षा भावी गुंतवणूकदारांना सक्षम-करण्यासाठी आहे, ज्यामुळे ते सुज्ञ निर्णय घेऊ शकतील आणि आर्थिक बाजारातील गुंतागुंत प्रभावीपणे समजून घेऊ शकतील.

### 2. SEBI इन्वेस्टर अव्हेरनेस टेस्ट (SIAT) कोण देऊ शकतो/शकते?

भारतीय आर्थिक बाजारांविषयी जाणून घेण्याची इच्छा असलेली कोणतीही व्यक्ती ही परीक्षा देऊ शकते. SIAT परीक्षेसाठी वय किंवा शैक्षणिक पात्रतेबाबत कोणतीही अट नाही.

### 3. SEBI इन्वेस्टर अव्हेरनेस टेस्ट साठी नोंदणी कशी करावी?

SEBI इन्वेस्टर अव्हेरनेस टेस्ट नोंदणी करण्यासाठी उमेदवाराने खालील संकेतस्थळावर उपलब्ध असलेला ऑनलाइन नोंदणी फॉर्म भरावा: https://sice.nism.ac.in/ नोंदणीच्या वेळी खालील तपशील भरावा लागेल:

- पूर्ण नाव (आधार कार्डप्रमाणे)
- मोबाईल क्रमांक
- ई-मेल आयडी (ई-मेल पडताळणीसाठी)
- जन्मतारीख
- राज्य
- जिल्हा
- व्यावसायिक स्थिती
- शैक्षणिक पात्रता
- आधार क्रमांक

तपशील भरल्यानंतर “Verify” बटणावर क्लिक करून आधार क्रमांकाची पडताळणी करा. पडताळणी झाल्यानंतर “Submit” बटणावर क्लिक करा.

### 4. SEBI इन्वेस्टर अव्हेरनेस टेस्ट पुढे कसे जायचे?

नोंदणी पूर्ण झाल्यानंतर उमेदवाराला ई-मेलद्वारे लॉगिन तपशील (क्रेडेन्शियल्स) प्राप्त होईल. या तपशीलांचा वापर करून उमेदवार https://sice.nism.ac.in/ या संकेतस्थळावर लॉगिन करून उपलब्ध अभ्यास साहित्य डाउनलोड करू शकतो/शकते. परीक्षा लिंक त्वरित सक्रिय होईल. उमेदवार नोंदणीनंतर लगेच परीक्षा देऊ शकतात.

**5. मी परीक्षा उत्तीर्ण झालो नाही तर पुन्हा परीक्षा देऊ शकतो/शकते का?**

जर उमेदवार परीक्षा उत्तीर्ण झाला नाही, तर त्याला सलग तीन वेळा परीक्षा देण्याची परवानगी आहे. त्यानंतर शेवटच्या प्रयत्नाच्या तारखेपासून तीन महिन्यांचा 'कूलिंग-ऑफ' कालावधी लागू होतो. उमेदवार त्याच लॉगिन तपशीलांचा वापर करू शकतात.

**6. परीक्षेची पद्धत आणि कालावधी काय आहे?**

परीक्षेत एकूण 50 प्रश्न असतात आणि ती परीक्षा 60 मिनिटांत पूर्ण करावी लागते.

**7. SIAT परीक्षेचे शुल्क किती आहे?**

ही परीक्षा पूर्णपणे मोफत आहे.

**8. परीक्षेची तयारी कशी करावी?**

नोंदणीनंतर मिळालेल्या लॉगिन तपशीलांचा वापर करून पोर्टलवरून (https://sice.nism.ac.in/) अभ्यास साहित्य डाउनलोड करता येते. याशिवाय, उमेदवारांनी SEBI गुंतवणूकदार संकेतस्थळावर उपलब्ध असलेली माहितीही पाहावी: https://investor.sebi.gov.in/iematerial.html

**9. मला परीक्षा लॉगिन तपशील कसे मिळतील?**

नोंदणी पूर्ण झाल्यानंतर लगेचच उमेदवारांना ई-मेलद्वारे लॉगिन तपशील पाठवले जातील. जर ई-मेल इनबॉक्समध्ये दिसत नसेल, तर कृपया 'स्पॅम' फोल्डर तपासा. कृपया लक्षात घ्या की नोंदणीनंतर लगेच परीक्षा देता येते आणि SIAT पोर्टलवर (https://sice.nism.ac.in/) "Start Exam" टॅबवर क्लिक करून परीक्षा सुरू करता येते.

**10. मी माझी परीक्षा नोंदणी रद्द किंवा पुनर्निर्धारित करू शकतो/शकते का?**

एकदा नोंदणी झाल्यानंतर उमेदवार नोंदणीच्या तारखेपासून कोणत्याही वेळी परीक्षा देऊ शकतात. त्यामुळे परीक्षा नोंदणी पुनर्निर्धारित करण्याची आवश्यकता नाही.

**11. SEBI इन्वेस्टर अव्हेरनेस टेस्ट मी केव्हा, कशी आणि कुठे देऊ शकतो/शकते?**

नोंदणीनंतर तुम्ही तुमच्या सोयीप्रमाणे कधीही आणि कुठेही ही परीक्षा देऊ शकता. तुम्ही डेस्कटॉप, लॅपटॉप किंवा अँड्रॉइड मोबाईल डिव्हाइसचा वापर करू शकता.

**12. SEBI इन्वेस्टर अव्हेरनेस टेस्ट उत्तीर्ण गुण किती आहेत?**

परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी उमेदवाराला किमान 50% गुण मिळवणे आवश्यक आहे, म्हणजेच एकूण 50 गुणांपैकी किमान 25 गुण.

**13. परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्र केव्हा आणि कसे मिळेल?**

परीक्षा सबमिट केल्यानंतर लगेचच उमेदवार पोर्टलवर (https://sice.nism.ac.in/) "Download Certificate" टॅबखाली प्रमाणपत्र डाउनलोड करू शकतात. तसेच, परीक्षेत मिळालेल्या गुणांची माहिती तुमच्या नोंदणीकृत ई-मेल आयडीवर पाठवली जाईल.

**14. परीक्षेत नकारात्मक गुणांकन आहे का?**

नाही, या परीक्षेत नकारात्मक गुणांकन नाही.

**15. एखाद्या उमेदवाराने परीक्षा लिंक उघडून चुकून/अनवधानाने परीक्षा न देता ती बंद केली, तर काय परिणाम होतील?**

जर उमेदवाराने परीक्षा लिंक उघडून किमान एक प्रश्न पाहिला आणि नंतर विंडो बंद केली, तर प्रणाली त्या उमेदवाराने परीक्षा "दिलेली" असल्याचे नोंदवते. अशा परिस्थितीत, जर तुम्ही चुकून विंडो बंद केली असेल, तर कृपया +91-8080806476 (NISM प्रमाणन हेल्पडेस्क) या क्रमांकावर संपर्क साधा किंवा certification@nism.ac.in या ई-मेल आयडीवर मेल पाठवा, जेणेकरून तुमची परीक्षा रीसेट/अनब्लॉक केली जाऊ शकेल. सध्याच्या प्रणालीप्रमाणे, अपूर्ण परीक्षा पुढील दिवशी सकाळी 8:00 वाजता आपोआप रीसेट होतात.

**16. मी ही परीक्षा स्थानिक (वर्नाक्युलर) भाषेत देऊ शकतो/शकते का?**

होय, उमेदवार ही परीक्षा इंग्रजी, हिंदी, मराठी किंवा बंगाली भाषेत देऊ शकतात. परीक्षेला बसताना उमेदवार आपली  इच्छित भाषा निवडू शकतात.

***